पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष महामहिम डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला.

2. उभय नेत्यांनी व्यापार, संरक्षण, ऊर्जा, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आणि परस्पर हिताच्या इतर क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्यातील प्रगतीचा आढावा घेतला.

3. त्यांनी भारत-अमेरिका सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली आणि उभय देशांच्या नागरिकांच्या फायद्यासाठी सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी निकटम प्रतिबद्धता राखण्यास सहमती दर्शविली.

4. नेत्यांनी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवरही विचारांची देवाणघेवाण केली आणि जागतिक शांतता आणि सुरक्षेला चालना देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर चर्चा केली.

5. उभय नेत्यांनी परस्परांच्या संपर्कात राहण्यावर सहमती दर्शविली.

नवी दिल्ली

30 सप्टेंबर 2026